CMYK

केंद्रीय अर्थसंकल्प : काय स्वस्त अन् काय महाग ?
>> पान 2

उत्तम आरोग्य व समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात आयुषला प्राधान्य
>> पान 3

कारच्या धडकेत रिक्षाचा चुराडा; अपघातात दोन महिलांचा जागीच मृत्यू, ७ जखमी
>> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
कार्यात रस असेल तर कार्य निश्चितच सरस ठरते.- अज्ञात

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई



दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या घराबाहेर गोळीबार करणारे सापडले, पुण्यातून ४ जणांना अटक

आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 173 ■ सोमवार, दि. 02 फेब्रुवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# अर्थमंत्री निर्मला सितारमण यांच्याकडून केंद्रीय अर्थसंकल्प सादर

## आयकर रचनेत कोणताही बदल नाही;पण इनकम टॅक्स भरणे आता आणखी सोपे होणार




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर करत आहेत. सलग नऊ वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रमही निर्मला सीतारमन यांच्या नावावर नोंदवला गेला आहे. यावर्षीचा बजेट हा युवकांना केंद्रस्थानी ठेवून बनवण्यात आल्याचे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले. विशेष म्हणजे या बजेटमधून आयकर रचनेत कोणताही बदल करण्यात आला नाही आहे.

आज (१ फेब्रूवारी २०२६) सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ मध्ये अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्रत्यक्ष कर (डायरेक्ट टॅक्स) मध्ये कोणतेही बदल जाहीर केले नाहीत.

गेल्या काही वर्षात प्राप्तिकर प्रणालीमध्ये लक्षणीय बदल झाले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात, प्राप्तिकरात ११ कर स्लॅब होते आणि सध्या, २०२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात सादर केलेल्या नवीन कर प्रणाली अंतर्गत फक्त ७ कर स्लॅब आहेत.

लवकरच सुरू होणार सरलीकृत आयकर प्रणाली :

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात घोषणा केली की, करदात्यांचा व्यवहार सुलभ करण्यासाठी लवकरच एक सरलीकृत आयकर प्रणाली अधिसूचित केली जाईल. त्यांनी असेही जाहीर केले की आयकर रिटर्न (आयटीआर) फॉर्म दाखल करणे सोपे आणि वापरकर्ता-अनुकूल करण्यासाठी पुन्हा डिझाइन करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे करदात्यांचा गोंधळ कमी होईल. तसेच आयकर दाखल करण्याची अचूकता सुधारेल आणि प्रक्रिया आणि परतावा जलद होईल अशी अपेक्षा आहे. करदात्यांना आता नवीन चौकट कशी कार्य करेल, अधिसूचनेची वेळ निश्चित होईल आणि सरलीकृत प्रणाली वजावट, भांडवली नफा आणि सूट यासाठी स्पष्ट नियम आणेल का याबद्दल माहितीची वाट पाहत आहे.

जुन्या आणि नवीन कर प्रणालीतील फरक:

जुन्या आणि नवीन कर प्रणालीमध्ये कर स्लॅब आणि दर वेगवेगळे आहेत. जुन्या कर प्रणालीमध्ये विविध वजावटी आणि अपवादांना परवानगी आहे, परंतु नवीन प्रणाली कमी कर दर देते, परंतु मर्यादित वजावटी आणि सूट देते.

आयकर स्लॅबआर्थिक वर्ष २०२६-२७ आणि कलम ८७अ अंतर्गत सवलत सध्या नवीन कर प्रणाली अंतर्गत प्राप्तिकर स्लॅब आहेत: ४ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त आहे - म्हणून मूळ सूट मर्यादा ४ लाख रुपये आहे. अनुपालनाचा भार कमी करण्यासाठी ही मर्यादा आणखी वाढवण्याची मागणी करदात्यांनी केली आहे.

४ लाख ते ८ लाख रुपयांच्या उत्पन्नावर ५म कर आकारला जातो. ८ लाख ते १२ लाख रुपयांच्या उत्पन्नावर १०म कर आकारला जातो. १२ लाख ते १६ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर १५म कर आकारला जातो, जो १६ लाख ते २० लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर २०म पर्यंत वाढतो. २० लाख ते २४ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर २५म कर आकारला जातो. २४ लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्नावर ३०म या सर्वोच्च स्लॅब दराने कर आकारला जातो. पगारदार करदात्यांना अर्थमंत्री सीतारामन यांनी ३०म कर वर्गासाठी उत्पन्न मर्यादा वाढवून ३० लाख रुपये करावी अशी इच्छा आहे. सध्या कलम ८७अ अंतर्गत सवलत मिळाल्यानंतर १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न (पगारदार करदात्यांसाठी १२.७५ लाख रुपये) करमुक्त आहे. कर तज्ञांचे म्हणणे आहे की ही मर्यादा १५ लाख रुपयांपर्यंत वाढवता येते.

अनेक करदाते जुन्या आयकर व्यवस्थेअंतर्गत कर परतावा भरत आहेत. त्यांना सरकारने कर दर कमी करावेत आणि त्या व्यवस्थेअंतर्गत म ूलभूत सूट मर्यादा वाढवावी अशी त्यांची इच्छा आहे. मानक वजावट जुन्या आणि नवीन आयकर व्यवस्थेअंतर्गत मानक वजावटीची मर्यादा वेगवेगळी आहे. जुन्या आयकर व्यवस्थेअंतर्गत कर भरणाऱ्यांना ५०,००० रुपयांच्या मानक वजावटीचा लाभ मिळतो, तर नवीन आयकर व्यवस्थेअंतर्गत येणाऱ्यांना ७५,००० रुपयांची उच्च मानक वजावट मिळू शकते. कर तज्ञांचे मत आहे की मानक वजावटीची मर्यादा वाढवण्याची शक्यता आहे, विशेषत: नवीन कर व्यवस्थेअंतर्गत ज्यामध्ये खूप कमी वजावट आणि सूट मिळतात.

## महाराष्ट्राला मिळणार सुमारे १ लाख कोटी!
## विकसित भारताकडे दमदार पाऊल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधीः** पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्त्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताकडे दमदार वाटचाल करणारा आहे. केंद्रीय करातून महाराष्ट्राला मिळणारा वाटा हा ९८,३०६ कोटी रुपये इतका असणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पाचे प्राथमिक आकलन करता, १२,३५५ कोटी विविध प्रकल्पांसाठी आहेत. त्यामुळे सुमारे १ लाख कोटी महाराष्ट्राला मिळतील, असे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

केंद्रीय अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना माध्यमांशी ते बोलत होते. शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक सरकार करणार आहे, पूर्वी जी केवळ १ लाख कोटी असायची. ५ लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील विकासाचा विचार करुन शहरीकरणाच्या एकात्मिक विचार करण्यात आला आहे. यातून विविध क्षेत्रांना दिशा, गती आणि निधी प्राप्त होणार आहे. याचा मोठा लाभ महाराष्ट्राला होणार आहे. शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. पुणे-हैदराबाद कॉरिडॉरचा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राला मोठा लाभ होईल. ग्रोथहबसाठी ५००० कोटी प्रत्येकी ५ वर्षांत प्राप्त होणार आहेत, याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबला होणार आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## मोदी सरकारने युरियाच्या किंमतीबाबत घेतला मोठा निर्णय, फायदा होणार की तोटा?

**मुंबई/प्रतिनिधीः** २०२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने सल्फर-लेपित युरियाच्या ४० किलोच्या पिशवीसाठी २५४ रुपयांची कमाल विक्री किंमत निश्चित केली आहे. यासंदर्भात अधिकृत अधिसूचना जारी करण्यात आली असून हा निर्णय खत (नियंत्रण) आदेश, १९८५ अंतर्गत तात्काळ लागू झाला आहे.

मंत्रालयाच्या माहितीनुसार, ही निश्चित किंमत देशभरातील डीलर्स, उत्पादक, आयातदार तसेच पूल हँडलिंग एजन्सींमार्फत चहा, कॉफी, रबर उत्पादक आणि इतर सर्व शेतकऱ्यांना लागू राहणार आहे. शेतकऱ्यांना युरिया ठरावीक आणि परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हावा, तसेच काळाबाजार आणि दरवाढीला आळा बसावा, हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, २५४ रुपयांची ही कमाल किंमत जीएसटी किंवा इतर केंद्र व राज्य करांचा समावेश न करता निश्चित करण्यात आली आहे. लागू असल्यास, हे कर विक्रीवेळी वेगळ्या स्वरूपात आकारले जाऊ शकतात.

लहान पिशव्यांसाठी अतिरिक्त शुल्क

डीलर्सना लहान वजनाच्या युरिया पिशव्यांवर पॅकिंग शुल्क आकारण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार २ किलोच्या पिशवीसाठी ?१.५०, ५ किलोसाठी ?२.२५, १० किलोसाठी ?३.५० आणि २५ किलोच्या पिशवीसाठी ?५ इतके अतिरिक्त शुल्क आकारता येणार आहे. ही अधिसूचना कृषी व शेतकरी कल्याण विभागाकडून जारी करण्यात आली असून त्यावर सहसचिव फ्रँकलिन एल. खोबांग यांची स्वाक्षरी आहे.

सल्फर-लेपित युरिया म्हणजे काय?

सल्फर-लेपित युरिया हा नायट्रोजनसोबत सल्फरचा थर असलेला सुधारित खत प्रकार आहे. सल्फर हे पिकांसाठी अत्यावश्यक अन्नद्रव्य असून ते जमिनीत असलेली सल्फरची कमतरता भरून काढते. यामुळे पिकांमध्ये प्रथिन निर्मिती सुधारते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

शेतकऱ्यांसाठी फायदे

सल्फर-लेपित युरियाचा वापर केल्याने मातीची सुपीकता वाढते, नायट्रोजनचा कार्यक्षम वापर होतो आणि उत्पादनात लक्षणीय वाढ दिसून येते. हे खत विद्यमान कडुनिंब-लेपित युरियाच्या तुलनेत अधिक परिणामकारक आणि किफायतशीर असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. विशेषत: तेलबिया पिकांसाठी सल्फर अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने या युरियाचा मोठा फायदा होणार आहे.

## महाराष्ट्रासाठी काय?

- महाराष्ट्र ग्रामीण रस्ते प्रकल्प : ३७८.३८ कोटी
- महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस प्रकल्प : १६७.२८ कोटी
- सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक क्लस्टर : २८३.७७ कोटी
- महाराष्ट्र टर्शरी केअर आणि वैद्यकीय शिक्षण विकास कार्यक्रम : ३८५.७८ कोटी
- उपसा सिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण : २०७.१० कोटी
- शेती आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प : ६४६.२४ कोटी
- मानवी विकासासाठी कौशल्य आणि अप्लाईड नॉलेज प्रकल्प : ३१३.६५ कोटी
- जिल्ह्यांमध्ये संस्थात्मक संरचना क्षमतावृद्धीसाठी : २४०.९० कोटी
- मुंबई-अहमदाबाद हायस्पीड कॉरिडॉर : ६१०३ कोटी
- मुंबई मेट्रो : १७०२ कोटी
- एमयुटीपी ३ : ४६२ कोटी
- एमएमआरमध्ये ग्रीन मोबिलिटी : १५५.३२ कोटी
- समृद्धी महामार्गावर आयटीएस : ६८०.७९ कोटी
- पुणे मेट्रो : ५१७.७४ कोटी

(ही केवळ मुंबई, पुण्यातील प्राथमिक आकडेवारी आहे. एकूण : १२,३५५ कोटी)

## केंद्रीय अर्थसंकल्पातून बेरोजगार, मध्यमवर्ग, शेतकरी व शहरी नागरिकांची घोर निराशा : हर्षवर्धन सपकाळ



**बुलढाणा/प्रतिनिधीः** केंद्र सरकारने सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावरून विरोधकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या अर्थसंकल्पावर जोरदार टीका केली आहे. या अर्थसंकल्पातून बेरोजगार, मध्यमवर्गीय, शेतकरी तसेच शहरी भागातील नागरिकांच्या पदरी केवळ निराशाच पडल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या अर्थसंकल्पात ना बेरोजगार युवकांसाठी ठोस रोजगारनिर्मितीची हमी आहे, ना शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव देण्याबाबत कोणतीही स्पष्ट भूमिका आहे. वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या, महागाई व मूलभूत सुविधांबाबतही अर्थसंकल्प पूर्णपणे अपुरा ठरल्याचे सपकाळ यांनी सांगितले.

''आत्मनिर्भर भारत'' ही संकल्पना केवळ घोषणापुरतीच मर्यादित राहिली असून, ती आता गाजराची पुंगी ठरली आहे. आत्मनिर्भरतेच्या नावाखाली देशात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आंतरराष्ट्रीय पातळीवर सातत्याने मवाळ भूमिका का घेतात, याचे उत्तर आंतरराष्ट्रीय अभ्यासकांनी द्यावे, असा टोला लगावत सपकाळ यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.या अर्थसंकल्पातून सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षांची पूर्तता न झाल्याने येणाऱ्या काळात याचे गंभीर परिणाम दिसून येतील, असा इशाराही त्यांनी दिला.

## शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा अर्थसंकल्प: रविकांत तुपकर

**बुलढाणा/प्रतिनिधीः** केंद्र सरकारने अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या माध्यमातून आज सादर केलेला अर्थसंकल्प हा शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसणारा असून, शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारा आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी व्यक्त केली.



सध्याची वाढती शेतकरी आत्महत्यांची संख्या आणि मोठ्या प्रमाणावर शेतकरी शेतीपासून दूर जात असल्याची गंभीर परिस्थिती लक्षात घेता, किमान हमीभाव संदर्भात ठोस आणि निर्णायक भूमिका घेण्याची अपेक्षा होती. मात्र या अर्थसंकल्पात हमीभावाबाबत कोणतीही स्पष्ट तरतूद किंवा दिशा दिसून येत नाही, असे तुपकर यांनी सांगितले.

सिंचन क्षेत्रासाठीही अर्थसंकल्पात कोणतीही मोठी किंवा भरीव तरतूद करण्यात आलेली नाही. शेतीसाठी आवश्यक असलेल्या अनुदानाचा (सबसिडी) अभाव ठळकपणे जाणवतो. केवळ ''आधुनिक शेती करा'' अशी मोघम घोषणा करण्यात आली असून, त्या आधुनिकतेसाठी लागणाऱ्या मूलभूत सुविधा, भांडवली गुंतवणूक आणि आर्थिक पाठबळ यांचा अर्थसंकल्पात पूर्णपणे अभाव आहे, अशी टीका त्यांनी केली.शेतकऱ्यांसाठी मोठी आर्थिक तरतूद करणे, शेतीमाल प्रक्रिया उद्योगांना चालना देणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी ठोस पावले उचलली जातील, अशी अपेक्षा होती. मात्र सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प हा शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरणारा असून, शेतकऱ्यांची दिशाभूल करणारा आहे, असे मत रविकांत तुपकर यांनी व्यक्त केले.

## कॉर्पोरेट साथ, कॉर्पोरेट विकास'चा अर्थसंकल्प : जयश्री शेळके



**बुलढाणा/प्रतिनिधीः** केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ हा सर्वसामान्य जनतेच्या हिताचा नसून, तो केवळ काही मोजक्या उद्योगपतींसाठी तयार करण्यात आल्याची तीव्र टीका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी केली आहे. या जनविरोधी अर्थसंकल्पाचा त्यांनी जाहीर निषेध केला.

महागाई, बेरोजगारी, शेतमालाला मिळणारा अत्यल्प दर, शिक्षण व आरोग्य व्यवस्थेची ढासळती स्थिती यासारख्या ज्वलंत प्रश्नांवर या अर्थसंकल्पात कोणत्याही ठोस उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, असे शेळके यांनी स्पष्ट केले. पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या सातत्याने वाढणाऱ्या किमतींमुळे सामान्य नागरिक आधीच त्रस्त असताना, या अर्थसंकल्पातून त्यांना कोणताही दिलासा देण्यात आलेला नाही, असा आरोप त्यांनी केला.

शेतकऱ्यांसाठी केवळ घोषणांचा पाऊस पाडण्यात आला असून, कर्जमाफी, हमीभाव तसेच उत्पादन खर्चावर आधारित दर याबाबत कोणतीही ठोस तरतूद दिसून येत नाही. त्यामुळे हा अर्थसंकल्प शेतकरीविरोधी असल्याचे त्यांनी म्हटले. रोजगारनिर्मितीबाबत केवळ पोकळ आश्वासने देण्यात आली असून, प्रत्यक्षात युवकांच्या हाताला काम मिळेल अशी कोणतीही ठोस योजना नाही. शिक्षण व आरोग्य क्षेत्रासाठी पुरेसा निधी न देता सरकार खासगीकरणाला प्रोत्साहन देत असल्याने सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक ओझे वाढणार आहे, असेही शेळके यांनी नमूद केले. हा अर्थसंकल्प 'जनतेसाठी नव्हे तर कॉर्पोरेटसाठी' असून, तो पूर्णतः जनविरोधी असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने या अर्थसंकल्पाचा तीव्र निषेध करण्यात येत असल्याचे जयश्री शेळके यांनी सांगितले.

CMYK

## विकसित भारताकडे वाटचाल..

अर्थसंकल्प हा नेहमी मागील वर्षाच्या आर्थिक पाहणीच्या आधारे मांडला जातो की ज्यामध्ये गतवर्षी आर्थिक क्षेत्रात असणारी आव्हाने आणि केलेली कामगिरी याची तपशीलवार माहिती सादर केली जाते. याच्याच आधारे आगामी अर्थसंकल्प मांडणे ही प्रक्रिया घडते. पंतप्रधानांचे अर्थ सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी सादर केलेल्या आर्थिक पाहणीत यावर्षीचा विकासदर हा सात टक्के असेल आणि अर्थव्यवस्था विकासदराच्याबाबतीत जागतिक स्तरावर नेहमीप्रमाणे अग्रेसर राहील असे म्हटले आहे. जीएसटी दरात केलेली कपात आणि आयकर सवलती याचा परिणाम म्हणून मागणी वाढली असली तरी दुसऱ्या बाजूला रुपयाची घसरण आणि विदेशी संस्था गुंतवणूकदार यांनी केलेला विक्रीचा मारा यातून भारतीय अर्थव्यवस्थेला अडचणीत आणले आहे. तथापि अशा संकटाच्या पार्श्वभूमीवरसुद्धा अर्थव्यवस्थेच्या प्रतिकारक्षमतेबाबत आशावाद व्यक्त केला आहे. भारताचा प्रवास आता स्वयंपूर्ण भारत ते विकसित भारत असा करण्यासाठी अंदाजपत्रक स्वरूप समजून घेणे महत्त्वाचे ठरते. प्रथमच रविवारी सादर होत असणारा अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन या नऊ वेळा अर्थसंकल्प सादर करीत आहेत. मोरारजी देसाई यांचा दहा वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम त्या पुढच्या वर्षी बरोबरीत करू शकतात. विकसित भारत हा तंत्रज्ञान आणि युवकांना रोजगार यांच्या आधारित पुढे जाऊ शकतो या भूमिकेतून अर्थसंकल्पात प्राधान्यक्रम मुख्यत्वे सुलभता, गतिमानता आणि तरुणांना रोजगार संधी यावर भर दिला आहे. पायाभूत सुविधांचा विकास हा सातत्याने महत्त्वाचा घटक मानला असून यावर्षी १२ लाख कोटी रुपये याकरिता खर्च केले जाणार आहेत. यातून रस्ते तसेच जलमार्ग, शहरांचा विकास या बाबी साध्य होणार आहेत. सार्वजनिक गुंतवणुकीसोबत खासगी गुंतवणूक यामध्ये आकर्षित करण्यासाठी पायाभूत सुविधा गुंतवणूक तसेच बांधकाम क्षेत्रात गुंतवणूक संधी वाढवल्या जाणार आहेत. राष्ट्रीय स्तरावर वीस जलमार्ग विकसित केले जाणार आहेत. सागरी मार्ग मार्फत मालवाहतुकीसाठी स्वस्त व कार्यक्षम असल्याने यावरही भर दिला आहे. विशेषीकृत मालवाहतूक कॉरीडॉर विकसित करण्यावर दिलेला भर हा भविष्यकालीन गुंतवणुकीचा व विकासाचा महत्त्वाचा मार्ग ठरतो. दुर्मीळ खनिजे हे आधुनिक तंत्र साधण्यासाठी आवश्यक असून भारतात केरळ, ओरिसा यासारख्या राज्यांमध्ये अशी खनिजे शोधण्यास तरतूद केली आहे. सेवा क्षेत्रात नेतृत्व सेवा क्षेत्र हे भारताचे सातत्याने विदेशी उत्पन्न मिळवून देणारे व रोजगार देणारे क्षेत्र असून भारत याबाबत जागतिक नेतृत्व करणारा ठरेल व जागतिक सेवापैकी दहा टक्के सेवा भारतातून दिल्या जातील यासाठी सेवा क्षेत्र प्राधान्याने विकसित केले जाणार आहे. तरुण आणि मोठ्या आकाराच्या लोकसंख्येला रोजगाराच्या संधी विविध क्षेत्रात उपलब्ध झाल्या तरच विकासाची प्रक्रिया खोलवर जाऊ शकते, या भूमिकेतून तरुणांच्या रोजगाराला विशेषतः कौशल्यपूर्ण रोजगाराला या अंदाजपत्रकाने प्राधान्य दिले आहे. भारताची समृद्ध व संपन्न परंपरा पर्यटनासाठी मोठे आकर्षण ठरू शकते. या क्षेत्रात प्रशिक्षित पर्यटन मार्गदर्शक तयार करण्यासाठी प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी भारतीय व्यवस्थापन संस्था यांचे मार्गदर्शन घेतले जाणार आहे. पर्यटनात गिरी भ्रमण, पक्षी निरीक्षण अशा नव्या बाबींचा समावेश करून या क्षेत्रात देशांतर्गत व विदेशी अशा दोन्ही पर्यटकांना सेवा देणे आणि रोजगार वाढवणे असे दुहेरी उद्दिष्ट यात आहे. मेडिकल टुरिझम किंवा आरोग्य पर्यटन हा देखील महत्त्वाचा घटक असून यासाठी पाच प्रादेशिक केंद्रे स्थापन केली जाणार आहेत. भारताचे योग तंत्र आयुर्वेद हे जागतिक स्तरावर आता गुणवत्तापूर्ण मार्ग म्हणून स्वीकारले असून या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून गुणवत्तापूर्ण सुविधा देणे यावर भर दिला जाणार आहे. भारतीय ज्ञानपरंपरेचा आर्थिक दृष्टिकोनातून वापर करणे हे महत्त्वाचे ठरते. बायो फार्मा किंवा जैव औषधे ही औषधाचा खर्च कमी करणारे तसेच अलीकडच्या काळात डायबिटीस, कॅन्सर अशा दुर्धर आजारावर देखील महत्त्वाचे ठरतात. यासाठी दहा हजार कोटी शक्ती प्रकल्पात तरतूद केली आहे. भारताने युरोपियन युनियनबरोबर नुकताच करार केला असून हा महाकरार भारताच्या वस्त्राऽद्योगाला अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पात मेगा टेक्स्टाईल पार्क स्थापन करणे व कृत्रिम तसेच नैसर्गिक वस्त्र प्रावरणे आणि औद्योगिक क्षेत्रासाठी लागणारे कापड अशा सर्व घटकांसाठी प्रोत्साहनात्मक तरतुदी केल्या आहेत. पशुधन हे शेतकऱ्याच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा घटक असून ६० टक्के उत्पन्न यापासून प्राप्त होते. त्यामुळे २००० पशुवैद्यकीय केंद्र वाढवण्यासाठी आवश्यक भांडवली आधार दिला जाणार आहे. ही पशुवैद्यकीय व्यवस्था ग्रामीण भागासाठी महत्त्वाचा आधार बैठक ठरू शकते. शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा वापर करून उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी सुविधा देणे या बाबीसुद्धा महत्त्वाच्या ठरतात. युवकांना नवनिर्मिती व मनोरंजन क्षेत्रात मोठा भाव असून ही नवी अर्थव्यवस्था ऑरेंज इकॉनोमी या नावाने ओळखली जाते. अशा क्षेत्रात धाडसपूर्ण गुंतवणूक करणे याकरिता मुंबईमध्ये विशेष केंद्र स्थापन केले जाणार आहे तसेच भारतातील पूर्व राज्यांमध्ये भारतीय डिझाईन इन्स्टिट्यूट स्थापन केली जाणार आहे. अंदाजपत्रकाच्या मूल्यमापनाचा महत्त्वाचा निकष हा वित्तीय शिस्तीचा असतो या दृष्टीने राजकोषीय तुटीचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४.४ टक्के ठेवण्यात अर्थमंत्र्यांना यश मिळाले आहे. महत्त्वाचे म्हणजे देशाच्या कर्जाचे राष्ट्रीय उत्पन्न असणारे गुणोत्तर ५५ टक्केवरून ५० टक्केपर्यंत पुढच्या तीन वर्षात घटवले जाणार आहे. यामुळे व्याजाचा बोजा कमी होऊन सरकारकडे गुंतवणुकीसाठी अधिक निधी राहणार आहे. वित्त व्यवस्थापन हाही एक सकारात्मक भाग मानावा लागतो. अंदाजपत्रकाच्या अपेक्षा या नेहमी आयकर सवलती वाढतील का व कोणत्या वस्तू स्वस्त होतील या दृष्टीने असते. या अर्थसंकल्पात विदेशी गुंतवणूक असणाऱ्याकरिता दंडाची रक्कम व शिक्षा यातून सूट देणाऱ्या तरतुदी केलेल्या आहेत. विदेशी अघोषित मालमत्ताधारकांना सवलती दिल्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे नवा आयकर कायदा १ एप्रिल २०२६ पासून लागू होत असून त्यामध्ये कर सुलभता हा महत्त्वाचा निकष सर्वांना लाभदायी ठरणार आहे. छोट्या गुंतवणूकदारांनी विविध कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली असली तरी त्यांना डिपॉझिटरी करूनच १५ जी किंवा एच हे प्रमाणपत्र मिळणार आहे. अपघात विम्याचे सर्व उत्पन्न करमुक्त करणे हे देखील महत्त्वाचे व आवश्यक घटक ठरते. भांडवली बाजारात होणारी सट्टेबाजी व त्यामध्ये युवकांचे होणारे नुकसान याबाबत सेबी या नियामक संस्थेने दहा पैकी नऊ गुंतवणूकदार नुकसानपात्र ठरतात हे सातत्याने स्पष्ट केले तरी यामध्ये मोठी उलाढाल होत असते. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी वायदे बाजारातील व्यवहारावर कर वाढ करण्यात आली. याचा परिणाम शेअर बाजार सुमारे २००० अंकाने घसरण्यात झाला. एकूणच अर्थसंकल्प भांडवल बाजारात अपेक्षित प्रोत्साहन देणारा नव्हता हे या प्रतिसादातून व्यक्त होते. तथापि अर्थसंकल्पातून दीर्घकालीन विकासाची पायाभरणी केली आहे. सर्वसामान्य गुंतवणूकदार, ग्राहक यांना अर्थसंकल्प फार आशावादी गुलाबी चित्र निर्माण करणारा नसला तरी युवक, मध्यम व छोटे उत्पादक यांना नव्या कौशल्यातून रोजगार देणारा असा आहे. महत्त्वाचे आर्थिक निर्णय आता अंदाजपत्रकापेक्षा अंदाजपत्रकाबाहेरच असतात, हे लक्षात घेतल्यास अंदाजपत्रकाबाबत खूप आशावादी राहिल्यास निराशा निश्चितच येते.

# केंद्रीय अर्थसंकल्प : काय स्वस्त अन् काय महाग ?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज १ फेब्रुवारी २०२६ रोजी संसदेत देशाचा २०२६-२७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला. सलग नवव्यांदा अर्थसंकल्प मांडून त्यांनी एक ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. ''गेल्या १२ वर्षापासून देश सातत्याने प्रगतीपथावर असून विकसित भारताच्या दिशेने आमची वाटचाल सुरू आहे,'' असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात गरिबी निर्मूलनासाठी सरकारने केलेल्या कामांचा गौरव केला. जीएसटी प्रक्रिया अधिक सोपी करणे आणि रोजगाराच्या संधी वाढवणे हे सरकारचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीयांसाठी काही सवलती आणि उद्योगांना बळकटी देण्यासाठी विविध घोषणा करण्यात आल्या आहेत. केंद्र सरकारच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात काय स्वस्त आणि काय महाग झाले ते पाहूया...



काय स्वस्त झालं?

मधुमेहाची औषधं
कॅन्सरची औषधं
क्रीडा साहित्य
मोबाईल फोन
ईव्ही बॅटरी
सौर पॅनेल
अपघात विमा
एलसीडी, एलईडी
भारतात बनवलेले कपडे
ईव्ही वाहने
मोटारसायकल
फ्रोझन मासे
ईव्ही लिथियम बॅटरी
वैद्यकीय उपकरणे
लिथियम आयन बॅटरी
परदेश प्रवास

काय महाग झालं?

दारु
भंगार
इंटरॅक्टिव्ह फ्लॅट पॅनल डिस्प्ले
बूट
पीव्हीसी फ्लेक्स शीट्स
खनिज
गुटखा
जर्दा (सुगंधित तंबाखू)

निर्मला सीतारमण यांच्या मोठ्या घोषणा-

राष्ट्रीय हातमाग धोरण कारागिरांना प्रोत्साहन आणि समर्थन प्रदान करेल. शैक्षणिक संस्थांकडून तांत्रिक सहाय्य शक्य होईल. मेगा टेक्सटाइल पार्क स्थापन केले जातील.

महात्मा गांधी ग्राम स्वराज - खादीला प्रोत्साहन देण्यासाठी - उत्पादन, प्रशिक्षण आणि विपणनासाठी असेल.

एक जिल्हा, एक उत्पादन याला प्रोत्साहन दिले जाईल.

क्रीडा - उपकरणे डिझाइन आणि उत्पादन करण्याची योजना आहे.

औद्योगिक समूह - पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान सुधारण्यासाठी एक योजना तयार करण्यात आली आहे.

एमएसएमईसाठी - सूक्ष्म उद्योगांना मदत करण्यासाठी स्वावलंबी भारत निधी तयार केला जाईल.

सरकारी संस्थांना अल्पकालीन म ॉड्यूलर अभ्यासक्रम डिझाइन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. टियर २ आणि ३ स्तरांपर्यंत प्रशिक्षण दिले जाईल.

मालवाहतुकीसाठी मालवाहतूक कॉरिडॉर बांधले जातील

५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या टियर-२ आणि ३ शहरांच्या विकासासाठी ?११.२ लाख कोटींचे वाटप करण्यात आले आहे. २०२६-२७ मध्ये ही रक्कम १२. २ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवली जाईल.

खासगी विकासकांसाठी पायाभूत सुविधा जोखीम हमी निधी तयार करण्यात आला आहे. सरकार अंशत: हमी देईल.

मालवाहतुकीसाठी एक समर्पित फ्रेट कॉरिडॉर बांधला जाईल. पूर्वे कडील दानकुनी ते पश्चिमेकडील सुरत या बंदराला जोडण्याची योजना देखील आहे.

वाराणसी आणि पटना विकसित करून अंतर्गत जलमार्ग विकसित केले जातील.

७ हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील.

देशातील सीप्लेन उत्पादकांना पाठिंबा दिला जाईल.

मुंबई ते पुणे, पुणे ते हैदराबाद, हैदराबाद ते बेंगळुरू, हैदराबाद ते चेन्नई आणि सिलिगुडी ते वाराणसी यासह सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील.

विकसित भारतासाठी एक उच्चस्तरीय बँकिंग समिती स्थापन केली जाईल.

## गांजा तस्कराला भाजप आमदाराने भररस्त्यात चोपला, बोरिवलीतील घटना

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी:** बोरिवली परिसरात गांजा तस्करी होत असल्याचा गंभीर आरोप भाजप आमदार संजय उपाध्याय यांनी केला आहे. बोरिवलीतील एका ठिकाणी सुरू असलेल्या कथित गांजा विक्रीची माहिती मिळाल्यानंतर संजय उपाध्याय यांनी कार्यकर्त्यांसह घटनास्थळी धाव घेतली. यावेळी त्यांनी एका संशयित गांजा तस्कराला जाब विचारला. वाद वाढल्यानंतर संबंधित व्यक्तीला आमदारांनी चोप दिल्याचा प्रकार घडल्याची चर्चा आहे.या घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली. बोरिवलीत खुलेआम अंमली पदार्थांची विक्री सुरू असून याकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संजय उपाध्याय यांनी केला आहे. तरुण पिढी गांजाच्या विळख्यात अडकत असून हे थांबवण्यासाठी कठोर कारवाई गरजेची आहे,असे ते म्हणाले.दरम्यान या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली असून संबंधित प्रकरणाची चौकशी सुरू आहे. कायदा हातात घेणे योग्य नसले तरी गांजा तस्करीसारख्या गंभीर गुन्ह्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहावे अशी मागणी स्थानिक नागरिकांकडूनही होत आहे. या घटनेमुळे बोरिवलीतील अंमली पदार्थ तस्करीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## तोंडाला मास्क, मध्यरात्री 1 तरुणी अन् 4 पुरुष उतरले रस्त्यावर, पुण्यात मोठा कांड!

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी:** पुणे शहरात कोयता गँगच्या दहशतीने पुन्हा एकदा डोके वर काढले असून, हडपसर भागातील बी. टी. कवडे रस्ता परिसरात शनिवारी रात्री या टोळीने अक्षरश: धुमाकूळ घातला. भरवस्तीत शिरलेल्या एका गँगने केवळ दहशतच माजवली नाही, तर सहा दुकानांचे शटर आणि काचा फोडून मोठे नुकसान केले. विशेष म्हणजे, या टोळीमध्ये एका महिलेचाही समावेश आहे.

नेमका प्रकार काय घडला?

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री जेव्हा लोक आपापल्या घरी जात होते, तेव्हा अचानक चार तरुण आणि एक महिला हातात धारदार कोयते घेऊन बी. टी. कवडे रस्त्यावर उतरले. या सर्वांनी ओळख लपवण्यासाठी तोंडाला मास्क लावले होते. हातात धारदार कोयते नाचवत त्यांनी आरडाओरडा केला आणि परिसरातील नागरिकांना धमकावण्यास सुरुवात केली. यामुळे रस्त्यावरील लोकांची एकच धावपळ उडाली.यानंतर टोळीने आपला मोर्चा रस्त्याच्या कडेला असलेल्या दुकानांकडे वळवला. त्यांनी एकामागून एक अशा तब्बल सहा दुकानांवर कोयत्याने प्रहार करत काचा फोडल्या. एवढ्यावरच न थांबता, रस्त्यावर पार्क केलेल्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांवरही या गुंडांनी कोयते मारले. वाहनांच्या काचा फुटल्याने मोठं आर्थिक नुकसान झालं आहे.

पुण्यातील कोयता गँगमध्ये आतापर्यंत केवळ पुरुष टोळ्यांचा सहभाग दिसून येत होता. मात्र, बी. टी. कवडे रस्त्यावरील या घटनेत एका म हिलेनेही सक्रिय सहभाग घेतल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले आहे. या टोळीचे नेतृत्व किंवा सहभाग असलेली ही महिला कोण? आणि 'लेडी डॉन' बनण्याच्या नादात पुण्यातील तरुणी गुन्हेगारीकडे वळत आहेत का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

# अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांसाठी नियोजन गरजेचे, उद्योजकांनी केली मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी:** केंद्रीय अर्थसंकल्पात जिल्ह्यासाठी अनेक अपेक्षा दरवर्षी असतात. तशा यंदाही आहेत, त्यामध्ये नवीन औद्योगिक वसाहतीसाठी नियोजन करणे गरजेचे असल्याचं मत उद्योजकांच्या संघटना सीएमआय अध्यक्ष उत्सव माचर यांनी व्यक्त केलंय. तर नवीन वेगवेगळ्या पद्धतीचे रिसर्च अँड डेव्हलपमेंटची कामं झाल्यास नवीन उद्योगांना चालना मिळेल, शिवाय गुंतवणूकदेखील मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्याचबरोबर रेल्वे आणि विमानसेवा यांची संख्या वाढवल्यास दळणवळणाची सोय होईल त्यातून देखील उद्योगवाढीला मदत मिळेल, असं मत सचिव मिहीर सोंदलगीकर यांनी व्यक्त केलंय.

पायाभूत सुविधा वाढवण्यात आल्या : छत्रपती संभाजीनगर येथील औद्योगिक वसाहतींमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. नुकतंच एक लाख कोटींची नवीन गुंतवणूक जिल्ह्यामध्ये होत असल्याची माहिती सरकारतर्फे देण्यात आलीय. त्या अनुषंगाने नवीन पायाभूत सुविधांची गरज निर्माण झालीय, अर्थसंकल्पात त्याची तरतूद केल्यास नवीन उद्योग येण्यास मदत होणार आहे, असं मत सीएमआयचे अध्यक्ष उत्सव माचर यांनी व्यक्त केलंय. अंतर्गत रस्ते, रिंग रोड यांची कामे झाल्यास दळणवळण वाढेल, आगामी काळात नवीन उद्योग आल्यानंतर ते फायदेशीर ठरतील. नवीन रोजगारांची संधी प्राप्त होणार असल्याने जे युवक कामाच्या शोधात बाहेर जिल्ह्यांमध्ये किंवा राज्यांम ध्ये गेले त्यांच्यासाठी रोजगार स्थानिक पातळीवर निर्माण झाल्यास त्यांचे कौशल्य इथे कामी येऊ शकेल, असा विश्वासदेखील उत्सव आचार यांनी व्यक्त केलाय.

ईव्ही क्षेत्रात नवीन संधी : छत्रपती संभाजीनगर येथील वाळुज औद्योगिक वसाहतीत बजाज कंपनीने आपले पाय रोवल्यावर त्याच्या संबंधित इतर अनेक नवीन उद्योग स्थापन होण्यास मदत झाली. तो मैलाचा दगड त्या काळात ठरला आणि शहराची औद्योगिक वाढ ही खऱ्या अर्थाने सुरू झाली होती. तशीच एक नवीन वाढ आता ईव्ही क्षेत्रात होत आहे. जिल्ह्यामध्ये अनेक ईव्ही दाखल होत असल्याने एक नवीन हब तयार होणार आहे, त्यामुळे त्याच्याशी निगडित अनेक नवीन जोडधंदे उभारले जाणार असल्याने त्या अनुषंगानेदेखील अर्थसंकल्पात तरतूद केल्यास मदत होणार आहे, असं मत अध्यक्ष उत्सव माचर यांनी व्यक्त केलंय.

रिसर्च आणि डेव्हलमेंट होणे गरजेचे : ऐतिहासिक ओळख असलेल्या जिल्ह्याला आता औद्योगिक ओळख प्राप्त होत आहे, त्या अनुषंगाने रिसर्च अँड डेव्हलपमेंटची कामं मोठ्या प्रमाणात झाल्यास नवीन गुंतवणूक त्यानिमित्ताने होणार आहे, असा विश्वास सीएमआयचे सचिव मिहीर सोंदलगीकर यांनी व्यक्त केलाय. जिल्ह्याम ध्ये असलेल्या वेगवेगळ्या उद्योगांना वाहतूक व्यवस्था चांगली करणे काळाची गरज झालीय. विशेषत: रेल्वेची आणि विमानांच्या संख्येत वाढ होणे अत्यंत गरजेचे झालंय. शेंद्रा आणि बिडकीन औद्योगिक वसाहतीत ड्रायपोर्टवर रेल्वे गेल्यास तयार झालेला माल बाहेर पाठवणे अधिक सुकर आणि स्वस्त होणार आहे. त्या माध्यमातूनदेखील उद्योगांना चालना मिळणार आहे. पायाभूत सुविधा जर अधिक भक्कम झाल्या तर झपाट्याने वाढणाऱ्या औद्योगिक विकासाशी बरोबरी साधने अधिक शक्य होणार आहे, असंदेखील मत सीएम आयए संघटनेचे सचिव मिहीर सोंदलगीकर यांनी व्यक्त केलंय.

# भटकंती आणि पर्यटनविषयक व्यवसाय आता सुरसाट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी पहिल्यांदाच कर्तव्य भवनात अर्थसंकल्प सादर करत असताना काही महत्त्वाचे मुद्दे या माध्यमातून अधोरेखित केले. ज्यामध्ये त्यांनी तीन महत्त्वाच्या कर्तव्यांचा उल्लेख केला. जिथं आर्थिक विकास वेगवान आणि दीर्घकालीन ठेवणे, जनतेच्या आकांक्षा पूर्ण करणे, सर्वसमावेशक विकास अशा गोष्टी त्यांनी उजेडात आणल्या. विविध क्षेत्रांसाठी यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या असून, मागील काही वर्षांमध्ये देशात उदयोन्मुख असणाऱ्या आणि प्रचंड लोकप्रिय ठरणाऱ्या पर्यटन क्षेत्रासाठीही त्यांनी महत्त्वाच्या घोषणा केल्या.

२०२६-२७ अर्थसंकल्पात पर्यटन क्षेत्रासाठी कोणत्या घोषणा?

वैद्यकिय पर्यटन केंद्र- (मेडिकल टुरिझम हब) या संकल्पनेअंतर्गत




सरकारनं खासगी क्षेत्राच्या भागिदारीनं देशातील पाच महत्त्वाच्या ठिकाणी 'मेडिकल टुरिझम हब'ची सुरुवात करण्याचा प्रस्ताव ठेवला. या केंद्रांमध्ये रुग्णालयं, उपचार केंद्र आणि आयुष अशा सुविधां एकत्रितरित्या उपलब्ध करून दिल्या जातील. जिथं परदेशातून आलेल्या रुग्णांचं लक्ष केंद्रीत होईल.

वारसा आणि सांस्कृतिक पर्यटन

सरकारकडून १५ पुरातत्व महत्त्वं असणाऱ्या ठिकाणांना प्रकाशझोतात आणत पर्यटनाच्या दृष्टीकोनातून त्यांचा विकास करण्यास सज्ज आहे. यामध्ये सारनाथ, हस्तिनापूर अशा ठिकाणांचा समावेश आहे. ही ठिकाणं सांस्कृतिक पर्यटन केंद्र म्हणून नावारुपास येतील. शिवाय देशात अध्यात्मिक आणि वारसा स्थळं असणाऱ्या ठिकाणांनाही राष्ट्रीय स्तरावर प्रकाशझोतात आणलं जाईल.

कनेक्टिव्हीटीत सुधारणा

देशातील कानाकोपऱ्यात असणाऱ्या ठिकाणांना एकमेकांशी जोडण्यासाठी सी प्लेन सेवांमध्ये वाढ करण्यात येईल. यासाठी सी प्लेन वायबिलिटी गॅप फंडिंग %उइ ही योजना अंमलात आणली जाऊ शकते. ज्यामुळं स्वदेशी सी प्लेन निर्मिती आणि संचलनाला प्रोत्साहन मिळेल शिवाय हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू काश्मीरमध्ये डोंगराळ भागात एक प्रगत रेल्वेजाळं तयार करण्यात येईल, ज्यामुळं येथील पर्यटनाला आणखी वाव मिळताना दिसले.

पर्यटन क्षेत्रासंदर्भातील आणखी महत्त्वाच्या घोषणा एका नजरेत...

- अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात पर्यटन, जागतिक ट्रेकिंग आणि हायकिंग आणि क्रीडा या अर्थसंकल्पातील योजनांची रूपरेषा मांडली.

- पर्यटन: नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ हॉस्पिटलिटी या संस्थेची स्थापन केली जाईल. २०लोकप्रिय पर्यटन स्थळांवर १०००० मार्गदर्शकांचे कौशल्य वाढवण्याची योजना सुरू केली जाईल. राष्ट्रीय डेस्टिनेशन डिजिटल नॉलेज ग्रिड स्थापन केला जाईल.

-जागतिक ट्रेकिंग आणि हायकिंग: हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर आणि अराकू व्हॅलीम ध्ये पर्वतीय ट्रेल्स बांधले जातील. ओडिशा, कर्नाटक आणि केरळमध्ये कासवांसाठी ट्रेल्स विकसित केले जातील.

- ढोलाविरा सारख्या १५ पुरातत्वीय स्थळांना सांस्कृतिक स्थळे म्हणून विकसित केले जाईल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# उत्तम आरोग्य व समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात आयुषला प्राधान्य

## ‘बायोफार्मा शक्ती’सारख्या सुधारणा आरोग्य सेवेला सक्षम करणार

### केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी:** यंदाचा अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या संकल्पनेचा मार्ग सुकर करणारा तसेच आयुष आणि आधुनिक औषधांचा संगम असून हा भारतातील आरोग्य सेवा अधिक मजबुत करण्यासाठी आणि १० हजार कोटी किमंतीचा ‘‘बायोफार्मा शक्ती ‘‘ सारख्या सुधारणा या आरोग्य सेवेला सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत, अशी प्रतिक्रिया केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली आहे.

हा अर्थसंकल्प शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उद्योजक, महिला विद्यार्थी आणि तरुणांना विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणारा आणि सर्वसामान्य व्यक्तीला दिलासा देणारा सोबतच देशाला आर्थिक महासत्तेच्या वाटेवर नेणारा असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

दिल्ली येथे अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज १ फेब्रुवारीला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामण यांनी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. उत्तम आरोग्य आणि समृध्द राष्ट्र निर्माण करण्यासाठी २०२६ च्या अर्थसंकल्पामध्ये आयुष आणि आरोग्य सेवेला प्राधान्य दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सितारामण यांचे केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आभार व्यक्त केले आहे. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पामध्ये आयुर्वेद क्षेत्रात उच्च गुणवत्तेचे शिक्षण आणि संशोधन करण्यासाठी तीन नवीन अखिल भारतीय आयुर्वेद संस्थान स्थापन करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. आयुष फार्मसी आणि औषध चाचणी प्रयोगशाळांना सुधारण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. पारंपरिक औषधांसाठी गुणवत्तापुर्वक संस्थांना अधिक सक्षम करण्यात येणार आहे.

पारंपरिक आयुर्वेदिक औषध निर्मितीसाठी संशोधन कार्याला गती देण्यात येणार आहे. जामनगर येथील डब्ल्यूएचओ जागतिक पारंपारीक औषध केंद्राची श्रेणी सुधारण्याचाही प्रस्ताव अर्थसंकल्पात मांडण्यात आला आहे. नवीन पाच प्रादेशिक वैद्यकीय मुल्य पर्यटन केंद्रामध्ये आयुष केंद्रे स्थापन करण्यात येणार आहे. ‘‘बायोफार्मा शक्ती‘‘ योजना भारताला जागतिक जैवफार्मा उत्पादन हब बनविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पुढील पाच वर्षांसाठी १०,००० कोटी रुपयांचा निधी आरोग्य व बायोफार्मा क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आला आहे.

या योजनेअंतर्गत बायोलॉजिक्स व बायोसिमीलर्स उत्पादन सक्षम करण्यात येणार आहे. बायोफार्मा आधारित औषध संशोधन व निर्मिती क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून या योजनेमुळे देशांतर्गत विकासाला प्रोत्साहन मिळणार आहे. नवीन राष्ट्रीयकृत फार्मास्युटीकल एज्युकेशन रिसर्च संस्थाची () स्थापना करण्याचा प्रस्ताव अर्थसंकल्पात ठेवण्यात आला आहे. त्यामुळे विद्यमान संस्थांमध्ये प्रगती होवून संशोधन कौशल्य विकास



वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे आरोग्य संशोधन,तंत्रज्ञान औषध विकासातील भारतातील जाळे सशक्त होणार आहे. भारतात १००० मान्यताप्राप्त क्लिनिक ट्रायल साईट संस्था निर्माण करण्याचा प्रस्ताव अर्थसंकल्पात ठेवण्यात आला आहे. त्यामुळे नवीन औषध निर्मिती विकास प्रक्रिया जलद होवून गुणवत्तापुर्वक आरोग्य सेवा मिळण्यास मदत होणार आहे. डायबिटीस, कर्करोग व ॲटो-इम्युन रोगांच्या रुग्णसंखेत वाढ होत असल्याने बायोफार्मा औषधांची गरज भविष्यात पडणार आहे. बायोफार्मा शक्ती या योजनेअंतर्गत रुग्णांसाठी उच्च दर्जाची औषधे निर्माण करुन ती औषधे सर्वसामान्यांना परवडणारी करण्यावर भर देण्यात आला आहे. प्रत्येक जिल्हा रुग्णालयामध्ये आपातकालीन व ट्रामा केअर केंद्राची स्थापना करुन ५० टक्के क्षमता वाढविण्याचे उद्दिष्ट या अर्थसंकल्पात ठेवण्यात आले आहे.

या अर्थसंकल्पात आयुर्वेद, योगा आणि पारंपरिक उपचार प्रणालीला महत्वाचे स्थान दिल्या गेले आहे. नवीन आयुष केंद्रे आणि शिक्षण संशोधन संस्था वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. आयुर्वेद, योगा आणि इतर आयुष सेवा आंतरराष्ट्रीय आरोग्य वेलनेस हब म्हणून विकसित करण्याचा प्रस्ताव या अर्थसंकल्पात ठेवण्यात आला आहे त्यामुळे आरोग्य आणि वेलनेस पर्यटनसाठी नवीन संधी निर्माण होणार आहे. उत्तम आरोग्य आणि समृध्द राष्ट्र निर्माण करण्यासाठी २०२६ च्या अर्थसंकल्पामध्ये आयुष आणि आरोग्य सेवेला प्राधान्य दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सितारामण यांचे आभार मानुन केंद्रीय आयुष, आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे.

# सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ वापरणाऱ्यांना फटका बसणार, काय आहे नवीन करप्रणाली?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी:** सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ आणि पान मसाला वापरणाऱ्यांना आजपासून अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. केंद्र सरकारने १ फेब्रुवारी २०२६ पासून या उत्पादनांसाठी नवीन कररचना लागू केली आहे. या मागचा उद्देश नियंत्रण अधिक कडक करणे आणि ’ग्ह्‌दद्‌’वर कराचा भार कायम ठेवणे हा आहे. नव्या व्यवस्थेनुसार, सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य उत्पादनांवर अतिरिक्त उत्पादन शुल्क आकारले जाणार आहे. त्याचबरोबर पान मसाल्यावर हेल्थ आणि नॅशनल सिक्युरिटी सेस लागू करण्यात आला आहे. आतापर्यंत या उत्पादनांवर २८ टक्के जीएसटी लागू होताना सुरू करण्यात आलेला कॉम्पेन्सेशन सेस आकारला जात होता. पण, ही जुनी करपद्धत आता बदलली आहे.

शींझ आधारित करप्रणाली लागू सरकारने तंबाखूजन्य काही उत्पादनांसाठी नवीन शींझ-आधारित मूल्यांकन प्रणाली आणली आहे. यात चघळण्याची तंबाखू, फिल्टर खैनी, जर्दा (सुगंधित तंबाखू), गुटखा आदी उत्पादनांचा समावेश आहे. आता या उत्पादनांवरचा जीएसटी कारखान्यातील किंमतीवर नव्हे, तर



थेट पॅकेटवर छापलेल्या किरकोळ किमतीवर आधारित असेल. या बदलामुळे करचुकवेगिरी रोखण्यास मदत होईल आणि सरकारचा महसूल वाढेल, असा अंदाज आहे.

उत्पादकांसाठी नवीन नियम नव्या कायद्यांतर्गत पान मसाला उत्पादकांना १ फेब्रुवारीपासून नवीन नोंदणी करावी लागणार आहे. याव्यतिरिक्त, कारखान्यातील सर्व पॅकिंग मशीन झाकतील असे ण्ऊ% कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. या कॅमेऱ्यांचे फुटेज किमान दोन वर्षे जतन करावे लागणार आहेत. तसेच कारखान्यातील मशीनची संख्या आणि उत्पादन क्षमता याची माहिती उत्पादकांना उत्पादन शुल्क विभागाला द्यावी लागेल. जर एखादे मशीन सलग १५ दिवस बंद राहिले, तर त्या कालावधीसाठी उत्पादन शुल्कात सवलत मागण्याची मुभा उत्पादकांना देण्यात आली आहे.

नवीन बदलांनंतरही सरकारने हे स्पष्ट केले आहे की, पान मसाल्यावरचा एकूण करभार मोठ्या प्रमाणात वाढणार नाही. ४० टक्के जीएसटीसह एकूण कर सध्या ज्या पातळीवर आहे (सुमारे ८८ टक्के), त्याच आसपास ठेवण्यात आला आहे.

# खुल्या समुद्रातील मासेमारी आता ’करमुक्त’; निर्यातीला मिळणार मोठी गती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात देशातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचे कणा असलेल्या पशुसंवर्धन आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रासाठी मोठ्या तरतुदी केल्या आहेत. पायाभूत सुविधा, कौशल्य विकास आणि धोरणात्मक बदलांच्या माध्यमातून या दोन्ही क्षेत्रांना जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प सरकारने सोडला आहे.

५०० जलाशयांचा होणार कायापलट

भारतीय मच्छिमारांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने १९६२ च्या सीमा शुल्क कायद्यात महत्त्वाची सुधारणा केली आहे. आता भारतीय जहाजांनी विशेष आर्थिक क्षेत्र ाणि खुल्या समुद्रातून पकडलेल्या माशांच्या आयातीवर कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच, परदेशी बंदरांवर उतरवलेले मासे आता ’निर्यात’ म्हणून मानले जातील, ज्यामुळे मच्छिमारांच्या उत्पन्नात मोठी वाढ होईल. याशिवाय, किनारपट्टी भागातील ५०० जलाशय आणि अमृत सरोवरांचा एकात्मिक विकास केला जाणार असून यामध्ये स्टार्टअप्स आणि महिला गटांना प्राधान्य दिले जाईल.

२० हजार पशुवैद्यांची भरती आणि नवीन हॉस्पिटल्ससाठी मिळणार सरकारी अनुदान

२० हजार व्यावसायिकांची नियुक्ती आणि नवीन कॉलेजेस शेती उत्पन्नामध्ये १६म वाटा असलेल्या पशुसंवर्धन क्षेत्रासाठी सरकारने मोठी घोषणा केली आहे. जनावरांची उत्पादकता वाढवण्यासाठी देशात २०,००० हून अधिक नवीन पशुवैद्यकीय व्यावसायिकांची भरती केली जाईल. खाजगी क्षेत्रात पशुवैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये आणि ब्रीडिंग सेंटर्स उभारण्यासाठी ’कर्ज-संलग्न भांडवली अनुदान योजना’ (थ्दरह- त्हझ्‌ा्‌ एरज्ूरत एल्ंब) सुरू करण्यात येईल. पशुसंवर्धन क्षेत्रात उद्योजकता वाढवून ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करणे, हे या अर्थसंकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

# दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या घराबाहेर गोळीबार करणारे सापडले, पुण्यातून ४ जणांना अटक

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी:** अभिनेता दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या घराबाहेर गोळीबार झाल्यानंतर एकच खळबळ उडाली. आता हा गोळीबार करणारे सापडले आहेत. या प्रकरणात ४ जणांना अटक करण्यात आली आहे. चौघांनीही पुण्यातून अटक करण्यात आली आहे.

मुंबईतील जुहूच्या पॉश एरियात रोहित शेट्टीचं घर आहे. याला शेट्टी टॉवर्स म्हणूनही ओळखलं जातं. ही एक १० मजली इमारत आहे. अनेक प्रमुख बॉलिवूड स्टार्स तिथं राहत असल्याने इथं आधीच सुरक्षा कडक असते. रात्री उशिरा या परिसरात गोळीबार झाला. रोहित शेट्टीच्या घराबाहेर चार राउंड फायर करण्यात आल्या. माहिती मिळताच मुंबई पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले. फॉरेन्सिक टीमनेही तपास सुरू केला. परिसर सील करण्यात आला असून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

दरम्यान आता या प्रकरणात पुण्यातील धायरी, वारजे आणि कर्वेनगर परिसरातून ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या चौघांची पार्श्वभूमी, संपर्क आणि हालचाली संशयास्पद असल्याने पुणे पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली. चौकशीदरम्यान या आरोपींचे मुंबईतील गुन्हेगारी टोळ्यांशी संबंध असल्याचे चिन्ह दिसून आले आहेत. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चारही जण देशातील कुख्यात गँगशी संबंधित असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. पुणे पोलिसांनी या आरोपींनी मुंबई क्राइम ब्रांचच्या ताब्यात दिलं आहे. आता पुढील तपास सुरू आहे.

## शब्दकोडे क्र. 74

आडवे शब्द

१. केस काळे करण्यासाठी वापरले जाणारे लाल फूल ३. कौशल्य ५. खळबळजनक ९. बैलाचा सण १०. सुंदर तरुणी ११. नगाऱ्याचा आवाज १२. दमणूक १४. हवेतील थंडावा १६. कौशल्य १८. सोने २०. कानाजवळचा भाग २२. एक मुस्लिम सण (महिना) २४. लपविणे २५. युद्ध २७. पाठवणी २९. भरवसा, भिस्त ३०. पादत्राण ३१. ’.. जय किसान’ ३३. बारा वर्षाचा काळ ३५. संगीत,सप्तसूर ३६. कालवा (हिंदी) ३७. अडत्या ४०. लोकमानस ४२. चांदी ४३. लिंबूपाणी ४४. थोर, मोठा ४५. संगोपन करणारा ४६. कडू पण आरोग्यदायी भाजी ४९. बाजार ५०. आच्छादन ५१. बारीक, मऊ केस ५२. धोबी ५३. मध्यप्रदेशातील प्रांत ५५. पार्वती ५६. संकट ५७. भारतीय चलन ५९. ओरखडा ६१. आई ६२. पाणकोंबडा ६३. च्या शिवाय ६५. तंबूची कापडी भिंत ६६. महेश भूपतीची पत्नी असलेली ’मिस इंडिया’ ६८. दालचिनी ७०. संस्कृत रामायणाचे हिंदी रुपांतर करणारे संत ७२. बरोबर आलेला फौजफाटा ७४. पृथ्वी ७५. दात ७६. पोर, बाळ ७६अ. आवर भराभर! ७७. शेवट ७८. परत ७९. राजपत्नी ८०. आश्रय ८१. हळूवार, नाजूकपणे

उभे शब्द

१. हातचलाखी करणारा २. दार, कवाड ३. गव्हाचे पीठ ४. लहान मुलांची गाणी ५. ठोकून काढणे, मारणे ६. नमस्कार ७. स्वामी ८. टीका करणारा ९. पायाच्या नळीचा मांसल भाग १३. अरण्य १५. रम्य १७. निवासस्थान १९. सकस २१. श्रीरामाचे तीन बंधु २३. पालखी, मेणा २६. कंटाळा, अनुत्साह २८. काळ्या तोंडाचे माकड २९. चर्चा ३१. नावाचा जयघोष ३२. जन्म (हिंदी) ३४. पालव ३८. कलंक लावणारा ३९. कोळशाची पूड ४१. वात्रट ४३. संपूर्ण ४४. आदिमाया, पार्वती ४५. अपमान ४७. मातीचा कण ४८. बाळ, पोर ५४. लायब्ररीला मराठी शब्द ५६. मोफतच्या विरुद्ध ५८. सतेज, तेजस्वी ६०. रात्रीचा पाऊस ६१. विपुलता, रेलचेल ६२. साखरेची फुगीर वडी ६३. भांडण, वैर ६४. घोड्याच्या पायाखाली लावण्याची लोखंडी पट्टी ६७. प्रत्येक वर्षी ६९. लपवणे, दाबून टाकणे ७१. अंगरखा ७३. दरवेशाचा चेला ७६अ. अजगर ७७. गाडीचे छत


### शब्दकोडे क्र. 73 चे उत्तर

आडवे उत्तर

१.अंथरुण पांघरुण ६.दम ८.नस ९.लालबहादूरशास्त्री १२.कालवाकालव १५.लटपटीत १६.रवा १७.लटलटणे १९.कपबशी २२.दवाखाना २५.टका २७.तरुण २९.टोक ३०.रोप ३१.डगर ३२.सापळा ३४.विकट ३५.चपापणे ३६.हजर ३८.उनाड ३९.पाळत ४०.परवा ४१.चावट ४३.तळतळाट ४५.नीज ४७.चाकरमानी ५२.कर्ण ५४.मसलत ५५.लक ५७.सदन ५९.मद ६०.धमक ६२.चमचम ६५.नार ६६.बत्तासा ६८.कनक ६९.बापजादे ७१.गळका ७२.क्षमायाचक ७४.अंबर ७५.भाळ ७६.सुसर ७७.वरात ७९.तिनात ८१.भार ८२.तारक ८३.डामरट ८४.दर

उभे उत्तर

१.अंध:कार २.रुसवा ३.धनवट ४.रूस ५.कलप ६.दर ७.मशाल ९.लाटणे १०.बटीक ११.हात पसरणे १३.लवाद १४.ललना १५.लटका १८.लटपट २०.शीतलहर २१.जाणकार २३.वाटोळा २४.खाक २६.सडपातळ २८.खिसा ३०.रोकड ३१अ.गप ३३.परवचा ३४.विना ३५.चळत ३७.जवानी ४०.पटकन ४२.टकमक ४४.तपास ४६.जलद ४८.रस ४९.मालमत्ता ५०.नीत ५१.पालम ५३.साधना ५६.कचकच ५८.दया ६१.मरगळ ६३.मनकवडा ६४.उपरती ६६.बकासुर ६७.साक्षरता ६९.बाबा ७०.देशांतर ७३.याचक ७४.अंतर ७५.भाक ७८.राम ८०.नाद



# कारच्या धडकेत रिक्षाचा चुराडा; अपघातात दोन महिलांचा जागीच मृत्यू, ७ जखमी

दैनिक आपला विदर्भ

**लोणार/प्रतिनिधी:** लोणार राज्यातील रस्ते अपघाताच्या घटना काही केल्या कमी होताना दिसून येत नाहीत. कधी वाहनांचा स्पीड, कधी खराब रस्ते तर कधी वाहनचालकांच्या चुकांमुळे हे अपघात होत असल्याचे समोर आले आहे.

विशेष म्हणजे आज सकाळीच नागपूरजवळ समृद्धी महामार्गावर अपघाताची भीषण घडना घडली होती, दुर्दैवी अपघातात दोघांचा मृत्यू झाला. त्यानंतर, आता बुलढाणा जिल्ह्यातील लोणारजवळ भीषण





अपघात होऊन दोन महिलांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातानंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली, मात्र अपघाताची तीव्रता तेथील चुराडा झालेल्या रिक्षावरुन लक्षात येईल.

लोणार ते किनगाव जट्टू मार्गावर भरधाव कारने समोरून येणाऱ्या रिक्षाला धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात रिक्षातील दोन मजूर महिलांचा मृत्यू झाला असून सात प्रवासी महिला गंभीर जखमी झाल्या आहेत.

जखमींपैकी तीन महिलांची प्रकृती चिंताजनक असून त्यांना विविध रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. येथील हा अपघात एवढा भीषण होता की कारच्या धडकेत रिक्षाचा चुराडा झाल्याचं पाहायला मिळत आहे. कारच्या धडकेमुळे अपघातानंतर रिक्षातील महिला दूरवर फेकल्या गेल्याने अनेकांना गंभीर जखम झाली आहे. तर, दोन महिलांचा मृत्यू झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी सर्वप्रथम घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर, पोलिसांना पाचारण करण्यात आले, अपघातातील जखमी महिलांवर लोणार व मेहकर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. माहिती मिळताच जखमींच्या नातेवाईकांनी रुग्णालयात धाव घेतली.

## वृत्तविशेष...

### जिल्हाधिकारी कार्यालयात संत रविदास महाराज यांना अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** थोर संत रविदास महाराज यांच्या जयंतीदिनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी जिल्हा नाझर गजानन मोतेकर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी फुलपुष्प अर्पण करुन अभिवादन केले.

### सिंदखेड राजाचे आमदार मनोज कायंदे झाले भाऊक.. अजित दादांच्या आठवणीने अश्रू अनावर..




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांच्या विमान अपघातातील दुर्दैवी निधनाने महाराष्ट्र हादरला असून, राज्यासह बुलढाणा जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.. बहुजन समाजाचे नेतृत्व करणारे एक रोखठोक नेते माझे पितृ छत्र गेल्याने वैयतिक नुकसान झाल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार मनोज कायदे यांनी व्यक्त केले. आज बुलडाणा येथे अजित दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी जिल्हा भरातील सर्वपक्षीय आमदार कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते यावेळी आमदार मनोज कायदे मत व्यक्त करत असताना भावुक होऊन त्यांना अश्रू अनावर झाले आहे. .

### अर्थसंकल्पात आर्टिफिशियल इंटेलिजेंस बाबत मोठी घोषणा; देखरेखीसाठी होणार नवीन समिती स्थापन

नवी दिल्ली : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज २०२६ चा अर्थसंकल्प सादर केला. त्यांनी अर्थसंकल्पात घोषणा केली की, भारताच्या सेवा क्षेत्रावर आर्टिफिशियल इंटेलिजेंस सारख्या नवीन तंत्रज्ञानाचा होणारा परिणाम तपासण्यासाठी सरकार एक नवीन समिती स्थापन करेल. ही समिती सेवा क्षेत्रात एआय कसा बदल घडवत आहे आणि त्याच्या भविष्यातील शक्यता आणि आव्हाने काय असू शकतात याचे मूल्यांकन करेल.

अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या की, ही समिती सेवा क्षेत्रातील वाढीची क्षमता वाढवणारी क्षेत्रे ओळखेल. तसेच रोजगार, उत्पादकता आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करणे हे यामागचे उद्दिष्ट आहे. अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान निर्मला सीतारमण पुढे म्हणाल्या की, २०२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात सरकारने घोषणाबाजी करण्याऐवजी विकासांवर लक्ष केंद्रित केले आहे. आपला देश विकसित भारत बनण्याच्या दिशेने ठोस पावले उचलत राहील. बजेटपूर्वी, देशातील आघाडीच्या तंत्रज्ञान कंपन्यांना आशा होती की सरकार एआय इकोसिस्टम, नवोन्मेष आणि डिजिटल पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्यासाठी ठोस पावले उचलेल.एकंदरीत, सरकारच्या या पावलावरून असे दिसून येते की येणाऱ्या काळात, भारताच्या सेवा क्षेत्राची दिशा आणि स्थिती निश्चित करण्यात एआय महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

### मंत्री छगन भुजबळ उद्या नाशिकमध्ये सोबत घेऊन येणार स्व.अजितदादा पवार यांचा अस्थिकलश

**नाशिक/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे नुकतेच विमान अपघातात दुःखद निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी उद्या दि.२ फेब्रुवारी २०२६ रोजी येवला व नाशिक येथे सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या शोकसभेस राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ हे स्व.अजितदादा पवार यांचा अस्थिकलश सोबत घेऊन येणार आहे. हा अस्थिकलश येवला व नाशिक येथील शोकसभेच्या स्थळी दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी १०.३० वाजता येवला शहरातील माऊली लॉन्स येथे सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी ३.३० वाजता नाशिक शहरातील महाकवी कालिदास कलामंदिर येथे सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या शोकसभेस स्व.अजितदादा पवार यांचे अस्थिकलश दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. या शोकसभेस प्रमुख मंत्री, खासदार, आमदार व विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते विविध सामाजिक संस्था आणि संघटनांचे पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची कार्यकर्त्यांची आजही इच्छा; १२ तारखेला मोठी घोषणा अपेक्षित – डॉ. राजेंद्र शिंगणे

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** गेल्या दोन–तीन महिन्यांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील दोन्ही गट एकत्र यावेत, अशी इच्छा वरपासून खालपर्यंत नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये होती, अशी माहिती माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी दिली. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस भविष्यात एकत्र यावेत, यासंदर्भात अनेक पातळ्यांवर चर्चा झाल्या असून, त्या चर्चांचा मी स्वतः साक्षीदार असल्याचे शिंगणे यांनी सांगितले.





अजित पवार यांच्या बोलण्यातून आणि त्यांच्या विचारांतून विलीनीकरणाबाबत सकारात्मकता दिसून येत होती. या दिशेने अनेक पावले उचलण्यात आली असून, पक्षाचे नेते जयंत पाटील यांच्या पुढाकारानेही काही ठिकाणी प्रयत्न सुरू होते. काल शरद पवार यांनी याबाबत स्पष्टपणे सांगितले की, येत्या १२ तारखेला या संदर्भातील घोषणा अजित पवार किंवा अन्य नेत्यांकडून होणार होती. आजही बुलढाणा जिल्ह्यातील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची एकत्र येऊन एका झेंड्याखाली काम करण्याची ठाम इच्छा असल्याचे शिंगणे यांनी नमूद केले.

शपथविधीला शरद पवारांना निमंत्रण नसल्याच्या मुद्द्यावर प्रतिक्रिया शपथविधी कार्यक्रमाला शरद पवार यांना निमंत्रण नव्हते, या प्रश्नावर बोलताना डॉ. शिंगणे म्हणाले की, रिक्त असलेली जागा लवकरात लवकर भरली जावी, असा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आग्रह असावा. पक्षाचे आमदार आणि खासदार यांचीही सुनिता ताईंना उपमुख्यमंत्री पदाची शपथ द्यावी, अशी इच्छा होती. त्या दृष्टीनेच हा निर्णय घेण्यात आला असावा.

जयंत पाटील यांनी व्यक्त केलेल्या शंकेवर स्पष्टीकरण या प्रकरणावर जयंत पाटील यांनी व्यक्त केलेल्या शंकेबाबत बोलताना शिंगणे यांनी सांगितले की, पवार साहेबांनी पहिल्याच दिवशी हा अपघात असल्याचे स्पष्टपणे सांगितले होते आणि यामध्ये कोणीही राजकारण करू नये, असे आवाहन केले होते. भविष्यात अनेक जण आपापली मते व्यक्त करतील. मात्र मुख्यमंत्र्यांनी सीआयडी चौकशी किंवा अन्य चौकशीचे आदेश दिलेले असून, यासंबंधी संपूर्ण चौकशी होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## कार व कंटेनर च्या धडकेत आई–मुलाचा दुर्दैवी मृत्यू



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी** : ठाणेकडून नागपूरच्या दिशेने जाणाऱ्या चालकाला झोपेची डुलकी आल्याने भरधाव कार पुढे असलेल्या कंटेनरवर जोरदार धडकली. हा अपघात इतका भीषण होता की कारचा चुराडा झाला. यात आई व मुलाचा मृत्यू झाला.

ही घटना १ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.२० वाजताच्या सुमारास समृद्धी महामार्गावरील सेलू पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नागपूर कॉरिडोर चॅनेज क्रमांक ३९/९०० परिसरात झाला. विवेकानंद हनुमंत कणबर्गी (५६) व आशालता हनुमंत कणबर्गी (८४) दोन्ही रा. ह. मु. रामनगर, नागपूर अशी मृतांची नावे आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, विवेकानंद कणबर्गी आणि आशालता कणबर्गी हे एम. एच. ०५ ए. एस. ७६१२ क्रमांकाच्या कारने ठाणे येथून नागपूरच्या दिशेने समृद्धी महामार्गाने जात होते. भरधाव कार महामार्गावरील चॅनेज क्रमांक ३९/९०० नागपूर कॉरिडोर परिसरात आली असता चालकाला झोपेची डुलकी आली. अशातच कार मिडल लेनवर पुढे चालत असलेल्या एम. एच. ४६ सी. एल. १५५६ क्रमांकाच्या कंटेनरला मागाहून धडकली. या अपघातात आशालता कणबर्गी यांचा जागीच मृत्यू झाला. तर कार चालवित असलेला आशालता यांचा मुलगा विवेकानंद कणबर्गी हे गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच महामार्ग बचाव पथकाने तातडीने घटनास्थळ गाठून जखमीला रुग्णवाहिकेच्या सहाय्याने सावंगी रुग्णालयात दाखल केले. पण, वाटेतच विवेकानंद यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी सेलू पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेतली आहे.

मदत केंद्राची चमू तातडीने घटनास्थळी

अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलिस मदत केंद्राचे पोलिस उपनिरीक्षक दिलीप थाटे, चंद्रकांत जीवतोडे, सतीश नैताम, भूषण टोंग, विकास काकडे, उद्धव डोंबाळे यांनी तातडीने घटनास्थळ गाठून मदत कार्य केले. अपघातग्रस्त वाहन क्रेनच्या सहाय्याने सुरक्षित ठिकाणी हलविले. अपघातामुळे काही वेळ या महामार्गावरील वाहतूक प्रभावीत झाली होती. अपघातग्रस्त वाहन बाजूला केल्यावर वाहतूक सुरळीत करण्यात आली.

## आमदार रोहित पवार यांनी घेतली फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांच्या कुटुंबीयांची भेट; पिंकीच्या भावाला दिलं नोकरीचं आश्वासन

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** :राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं बाराम ती येथे विमान अपघातात मृत्यू झाला असून त्यांच्यासोबत सुरक्षारक्षक आणि वैमानिकांचं देखील या अपघातात मृत्यू झाला आहे. आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आमदार रोहित पवार यांनी फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांच्या वरळी (मुंबई) येथील घरी भेट देऊन कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली आणि विचारपूस केली.

रोहित पवार यांनी माळी कुटुंबियांची



सांत्वनपर भेट घेतली : बारामतीतील विमान अपघातात अजितदादांसह फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी (२८) यांचाही अत्यंत कमी वयात दुर्दैवी मृत्यू झाला. आयुष्याची इनिंग सुरु होत असतानाच नियतिच्या फेऱ्यापुढं ब्रेक लागला, त्याम ुळं माळी कुटुंबावर झालेला हा आघात अत्यंत मोठा आहे. यातून सावरण्यासाठी मदत व्हावी म्हणून आमदार रोहित पवार यांनी त्यांच्या वरळी (मुंबई) येथील घरी भेट देऊन कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली आणि विचारपूस केली.

बहिणीचं अधुरं स्वप्न पूर्ण करण्याची इच्छा : पिंकी यांची झेप थांबली असली तरी त्यांच्या भावाला एव्हिएशन इंडस्ट्रीजमध्ये काम करुन बहिणीचं अधुरं स्वप्न पूर्ण करण्याची इच्छा आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी आवश्यक तिथं हात देण्याचा शब्द माळी कुटुंबाला रोहित पवार यांनी दिला.

## ॲड. जयश्रीताई शेळके यांच्या हस्ते यशस्वी तरुणांचा सत्कार

### नांद्रकोळी गावाचा अभिमान : एकाच वेळी पाच तरुणांची भारतीय सुरक्षा दलात निवड

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : नांद्रकोळी (ता. बुलढाणा) येथील एकाच गावातून तब्बल पाच तरुणांची भारतीय सुरक्षा दलांमध्ये निवड होणे ही अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी बाब आहे. प्रविण संजय चौधरी (), गणेश राजू शिंदे (), आकाश प्रकाश राऊत (), सचिन गणेशराव राऊत () आणि दिलीप अर्जुन उबाळे () या पाचही तरुणांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर देशसेवेचा मान मिळवला आहे.

विशेष म्हणजे हे सर्व तरुण शेतकरी कुटुंबातून आलेले असून, आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही त्यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमांच्या बळावर हे यश संपादन केले आहे.





आजचा तरुण बेरोजगारी, स्पर्धा आणि सामाजिक तणावामुळे निराशेकडे झुकत असताना, नांद्रकोळीच्या या पाच तरुणांनी कठोर परिश्रम, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या जोरावर यश संपादन करून आशेचा नवा किरण निर्माण केला आहे. त्यांच्या यशामुळे तरुणांनी निराशेला दूर सारून ध्येयवादी व देशसेवेची वाट निवडावी, असा प्रेरणादायी संदेश समाजाला मिळाला आहे. या सर्वांबरोबरच नांद्रकोळी गावचेच विष्णू पुंडलिक उबाळे हे मागील दोन वर्षांपासून मिझोराम येथे मध्ये कार्यरत असून, ते देखील गावासाठी अभिमानाचे प्रतीक ठरत आहेत.

या यशस्वी तरुणांचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या जयश्रीताई शेळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना जयश्रीताई शेळके म्हणाल्या की, "ग्रामीण भागातील, शेतकरी कुटुंबातील तरुणांनी देशसेवेच्या माध्यमातून मिळवलेले हे यश संपूर्ण समाजासाठी अभिमानाची गोष्ट आहे. अशा तरुणांच्या पाठीशी समाज आणि शासनाने भक्कमपणे उभे राहिले पाहिजे." यावेळी नांद्रकोळी गावचे उपसरपंच मनोज जाधव, भानुदास हुडेकर, अशोक हूडेकर, नाना राऊत, राहुल चौधरी, परमेश्वर वानखेडे उपस्थित होते.